# महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकांना/डीबीटी पोर्टल /Right to give up/२०२३-२४/1912 दिनांक:- 25 JUN 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :** महाडिबीटी पोर्टलवर प्राचार्यांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या Right to up give up Revert करण्याच्या पर्यायाबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं / विकाप /Right-to-give-up/ २३-२४ / २७०/ दि. २० /०६/२०२४

संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशित शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून पोर्टलवरील चुकून Right to Give Up Option निवडला गेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्राचार्य लॉगीनमध्ये Revert करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तरी, ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित पर्याय निवडला आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्जावर कार्यवाही करून सदर अर्ज मंजूर करून घेण्यात यावे. **ही संधी एकदाच व अंतीम ~~ट्रेप्रसत~~ स्वरुपात देण्यात आलेली आहे व दिनांक ३० जून २०२४ या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर ही सुविधा बंद करण्यात येणार आहे.** याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व विद्यार्थ्यांना सुचना देण्यात यावे. तसेच संस्थेच्या प्राचार्यांनी सुद्धा दक्षता घ्यावी. जेणे करून भविष्यात चुकून सदर पर्याय निवडून विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाही,

सहपत्र :- संदर्भिय पत्र संलग्न

( डॉ. सचिन बि. सोलंकी )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

६/८

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल: desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तातडीने :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र:- १८/तंशिसं/विकाप/Right-to-give-up/२३-२४/२७०
दिनांक :- २० /०६ /२०२४

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

**विषय : महाडीबीटी पोर्टलवर प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Right to Give Up Revert करण्याच्या पर्यायाबाबत.....**

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.साप्रवि-२०२३/प्र.क्र.६२/रो-१/३९, दि.०३/०१/२०२४.
२.सामान्य प्रशासन (मा.तंत्रज्ञान) विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-१७२४/प्र.क्र.१३४/मावतं दि.१८/०६/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाआयटीकडून महाडीबीटी पोर्टलवर शासन योजनांच्या लाभासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये, अर्ज भरण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये Right to Give Up पर्यायाचे बटन उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

महाडीबीटी पोर्टलवर योजनांच्या लाभासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनमध्ये Right to Give Up बटनाचा पर्याय उपलब्ध करुन दिल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी नजर चुकीने किंवा त्याचा अर्थ न समजल्याने Right to Give Up बटनाचा वापर केल्याने व अशा विद्यार्थ्यांना परत अर्ज भरता येत नसल्या कारणाने विद्यार्थी शासनाच्या योजनेच्या लाभापासून वंचित राहात होते.

त्या अनुषंगाने, Right to Give Up पर्यायाच्या बटनाबाबत विद्यार्थी/संस्था यांच्याकडून विद्यार्थ्यांने नजर चुकीने Right to Give Up बटनाचा वापर झाला असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत असल्याकारणाने, सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.२ च्या अन्वये, महाडीबीटी पोर्टलवरील Right to Give Up या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रिंसिपल लॉगीनला परत करण्याबाबत आणि सदर अर्जाची महाविद्यालय स्तरावर तपासणी होऊन, सदर विद्यार्थ्यांना पुन:श्च महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

संदर्भीय पत्र क्र.२ च्या अनुषंगाने, सोबत जोडलेल्या प्राचार्य लॉगीनच्या स्क्रिन शॉटनुसार, महाआयटीकडून ज्या विद्यार्थ्यांकडून पोर्टलवर चुकून Right to Give Up Option निवडला गेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्राचार्य लॉगीनमध्ये Revert Right to Give Up अंतर्गत विद्यार्थ्यांकडून वापरण्यात आलेला Right to Give Up हा Revert

करणे याकरिता पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.ही संधी एकदाच व अंतीम स्वरुपात देण्यात आलेली आहे व दिनांक ३० जून,२०२४ या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर ही सुविधा बंद करण्यात येणार आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येत असलेल्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना, ज्या विद्यार्थ्यांनी नजर चुकीने किंवा त्याचा अर्थ न समजल्याने Right to Give Up बटनाचा वापर केल्याने, शासनाच्या योजनेपासून वंचित राहिले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज Revert Right to Give Up पर्यायाचा वापर करुन दिनांक ३० जून,२०२४ पूर्वी Revert करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याबाबत सूचित करावे जेणेकरुन नजर चुकीने किंवा त्याचा अर्थ न समजल्याने Right to Give Up बटनाचा वापर केलेला कोणताही पात्र विद्यार्थी शासनाच्या योजनेपासून वंचित राहणार नाही.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

प्रत माहितीकरिता सविनय सादर :

1) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२
2) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग
७११, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दुरध्वनी क्र.०२२-२२०२४१७७ ई-मेल- do31-dit@mah.gov.in

क्र.संकीर्ण- १७२४/प्र.क्र.१३४/माबतं दिनांक - १८ जून,२०२४

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक ,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ,
मुंबई

विषय :- महाडिबीटी या पोर्टलवर अर्ज करतेवेळी चूकून right to give up option हे बटन दाबले गेले असल्याने त्या विद्यार्थ्यांना Revert option उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच याकरिता महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/०६/२०२४ पर्यंत वाढविणेबाबत....

महोदया,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाडिबीटी पोर्टलवरील Right to Give up या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रिंसिपल लॉगिनला परत करण्याबाबत आणि सदर अर्जाची महाविद्यालय स्तरावर तपासणी होऊन, सदर विद्यार्थ्यांना पुनःश्च महाडिबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तदनुषंगाने, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांकडून पोर्टलवर चुकून RIGHT TO GIVE UP OPTION निवडला गेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज Principal Login ला परत करण्यात यावेत. तदनंतर सदर अर्जाची महाविद्यालय स्तरावर तपासणी होवून त्यांना पुनश्च महाडिबीटी प्रणालीवर Online अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन द्यावी, ही संधी एकदाच व अंतीम स्वरुपात देण्यात यावी व दि. ३० जून, २०२४ या अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकानंतर ही सुविधा बंद करण्यात यावी. तसेच महाडीबीटी पोर्टलवर सन २०२३-२४ करिता अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २५ जून, २०२४ ऐवजी दि. ३० जून, २०२४ पर्यंत वाढविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे, ही विनंती.

आपली,

(मे. सु. भोगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :-

१) उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) उप सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scrutiny

Reports

- DBT Dashboard
  - Allotment Date Wise Report
  - Institute Disbursement Report
  - Student Disbursement Report
  - Benefit Component Report
  - Status wise Application Detail

Institute

- Deactive Duplicate Aadhaar Profile
- Fee Correction Request
- Reset Mobile Number
- Update Bank Account
- Revert Right To Give Up

## Revert Right to Give Up Application

**Application ID**

**Remark**

☒ **The applicant appears to be an eligible candidate, and based on the applicant's request, I am proceeding with the reactivation of the 'Right to Give up' application for the next steps of the scrutiny process.**

[illegible]